**ठळक बातम्या**

- राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरचा आभारप्रस्ताव लोकसभेत आवाजी मतदानाने मंजूर
- आभारप्रस्तावावरच्या चर्चेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज राज्यसभेत उत्तर देणार
- राज्यात जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीसाठीचा प्रचाराचा आज शेवटचा दिवस
- नवी मुंबई महानगरपालिकेत महापौर आणि उपमहापौरपदी भाजपा उमेदवारांची बिनविरोध निवड

**आणि**

- मुंबई पुणे एक्सप्रेस वे वरच्या ३३ तासांच्या कोंडीचा पुरवठ्यावर परिणाम

**<><><><><>**

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरचा आभारप्रस्ताव आज लोकसभेनं आवाजी मतदानानं मंजूर केला. राष्ट्रपतींनी २८ जानेवारी रोजी संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीला संबोधित केलं होतं. आभारप्रस्ताव मंजुरीचा प्रस्ताव भाजपा खासदार सर्बानंद सोनोवाल यांनी मांडला, त्याला तेजस्वी सूर्या यांनी अनुमोदन दिलं.

त्याआधी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी केलेल्या घोषणाबाजीमुळे आज लोकसभेचं कामकाज दुपारी बारा, दुपारी दोन आणि नंतर दुपारी तीन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

सभागृहाचं आजचं कामकाज सुरू झाल्यावर सभापती ओम बिर्ला यांनी विरोधी पक्षाच्या सदस्यांच्या कालच्या वर्तनावर नापसंती व्यक्त केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे काल राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरल्या आभारप्रस्तावावरच्या चर्चेला उत्तर देणार होते, मात्र भाषण सुरू होण्यापूर्वीच विरोधी पक्षाचे सदस्य घोषणाबाजी

करत सत्ताधारी बाकांकडे धावले. हे वर्तन सभागृहाच्या मर्यादेचं उल्लंघन असल्याचं सभापती म्हणाले.

**<><><><><>**

राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दल आभारप्रस्तावावरच्या चर्चेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज राज्यसभेत उत्तर देतील, अशी माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी दिली. प्रधानमंत्री कालच लोकसभेत उत्तर देणार होते, मात्र सभागृहात गदारोळ वाढत गेल्यानं कामकाज तहकूब झालं होतं.

राज्यसभा हे एकच सभागृह नसून लोकसभा आणि राज्यसभा मिळून संसद बनते, असं सांगत, प्रधानमंत्र्यांनी केवळ राज्यसभेत भाषण करण्याला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आक्षेप घेतला. यावर सर्व सदस्यांना प्रधानमंत्र्यांचं भाषण ऐकण्याची इच्छा आहे मात्र काँग्रेसला नाही, असं प्रत्युत्तर मंत्री किरेन रिजिजू यांनी दिलं.

राज्यसभेत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांना सभागृहात माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे यांच्या पुस्तकातला मजकूर वाचून दाखवायची परवानगी नाकारण्यात आली. त्यामुळे विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभात्याग केला.

**<><><><><>**

ॲप-आधारित वाहन सेवा देणारी सुविधा 'भारत टॅक्सी' चं उद्घाटन केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत होणार आहे. हा भारताचा पहिला सहकारी-आधारित राईड-हेलिंग प्लॅटफॉर्म आहे. अशी माहिती सहकार मंत्रालयानं दिली. भारत टॅक्सीची संकल्पना दळणवळण क्षेत्रातला एक परिवर्तनकारी उपक्रम ठरेल, सेवा देणाऱ्या चालकाला सारथी या नावानं संबोधलं जाईल, आणि सारथी हाच मालक या संकल्पनेवर आधारित परिचालन आणि मूल्य निर्मितीच्या केंद्रस्थानी तो असेल. याद्वारे 'बाईक दीदी' सारखे उपक्रम राबवले जात

असून आतापर्यंत दीडशेहून अधिक महिला चालक भारत टॅक्सीमध्ये सहभागी झाल्या आहेत.

<><><><><>

छत्तीसगडमधल्या बिजापूर जिल्ह्यात आज सकाळी सुरक्षा दलांबरोबरच्या चकमकीत एक नक्षली अतिरेकी ठार झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. पोलिसांना या नक्षलवाद्याचा मृतदेह सापडला असून त्याच्या जवळून एक AK 47 रायफल जप्त करण्यात आली आहे. जम्मू काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यात सुरक्षा दलांच्या कारवाईत एक दहशतवादी मारला गेला.

<><><><><>

पर्यावण संरक्षण नियमांचं उल्लंघन करणाऱ्या प्रकल्पांना पूर्वलक्ष्यी प्रभावानं मंजुरी देण्यासंदर्भातल्या याचिकांवर नव्यानं सुनावणी करण्यासाठी वेगळं पीठ स्थापन करावं, अशी मागणी करणारी याचिका आज सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली. गेल्या वर्षी १८ नोव्हेंबर रोजी तत्कालीन सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या अध्यक्षतेखालच्या पीठानं दोनास एक अशा बहुमतानं, अशी मंजुरी देण्याचा मार्ग मोकळा केला होता. मात्र, आता नव्यानं या प्रकरणी पीठाच्या स्थापनेची मागणी करण्यात आली. या मागणीसंदर्भात विचार करून निर्णय दिला जाईल, असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीचा प्रचार आज संपत आहे. येत्या शनिवारी, सात तारखेला मतदान होणार असून, नऊ तारखेला मतमोजणी होईल. या निवडणुकांसाठी मतदारांना आपलं नाव आणि मतदान केंद्र सहज शोधता यावं, यासाठी राज्य निवडणूक आयोगानं मताधिकार हे मोबाईल ॲप उपलब्ध करून दिलं आहे.

<><><><><>

नवी मुंबई महानगरपालिकेच्या महापौर पदी भाजपाच्या सुजाता सूरज पाटील यांची तर उपमहापौर पदी भाजपाचे दशरथ सीताराम भगत यांची बिनविरोध निवड झाली आहे. दोन्ही पदांसाठी शिवसेनेच्या उमेदवारांनीही अर्ज भरले होते, मात्र त्यांनी माघार घेतली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे दोन नगरसेवक, मनसेचा एक नगरसेवक, आणि एक अपक्ष नगरसेवक यांनीही भाजपाला पाठिंबा दिला आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदाच्या निवडीसाठी आज महापालिका मुख्यालयात विशेष सभा घेण्यात आली.

<><><><><>

मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर मुंबईकडे येणारी वाहतूक तब्बल ३३ तासानंतर पुन्हा सुरळीत सुरु झाली. खंडाळा घाटात मंगळवारी मुंबईकडे येणाऱ्या मार्गावर आडोशी बोगद्याजवळ ज्वलनशील वायू घेऊन जाणारा एक टँकर उलटल्यानं वाहतूक खोळंबली होती. यामुळे रस्त्यावर वाहनांच्या  लांबच लांब रांगा लागल्या होत्या. वाहनात अडकलेले प्रवासी, महिला आणि लहान मुले यांची गैरसोय झाली. यावेळी दूध आणि भाजीपाल्याची वाहतूक करणारे ट्रक देखील अडकून पडल्यानं जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्यावर परिणाम झाला.

एसटी महामंडळालाही या वाहतूक कोंडीचा फटका बसला. दोन्ही शहरांदरम्यान धावणाऱ्या शिवनेरी आणि साध्या गाड्यांच्या अनेक फेऱ्या रद्द कराव्या लागल्यानं एसटीच्या एकट्या पुणे विभागाचं एक दिवसात सुमारे ५० लाख रुपयांचं  नुकसान झालं. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. या वाहतूक कोंडीच्या काळात प्रवाशांकडून वसूल केलेला टोल सरकारनं परत करावा, अशी मागणी  मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केली आहे.

<><><><><>

पालघर जिल्ह्यात पोलिसांनी दोन कारवायांमध्ये अंमली पदार्थ जप्त केले असून ५ जणांना अटक केली आहे. तलासरी तालुक्यात पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात २ किलो ९०० ग्रॅमपेक्षा जास्त वजनाचा गांजा जप्त केला. या प्रकरणी दोन जणांना अटक करण्यात आली आहे. तर अन्य एका कारवाईत पोलिसांनी २१ लाख ५० हजार रुपये किमतीची अफू जप्त केली असून तीन जणांना अटक केली आहे. मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी सोमटा गावातल्या एका घरावर छापा टाकला. या छाप्यातून १४३ किलो ५१ ग्रॅम वजनाची अफुची बोंडं आणि त्याची पूड जप्त करण्यात आली. या प्रकरणी तीन जणांना अटक केली असून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

<><><><><>

पालघर जिल्ह्यात पोलिसांनी दोन कारवायांमध्ये अंमली पदार्थ जप्त केले असून ५ जणांना अटक केली आहे. तलासरी इथं पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात २ किलो ९०० ग्रॅमपेक्षा जास्त वजनाचा गांजा जप्त केला. या प्रकरणी दोन जणांना अटक करण्यात आली आहे. तर अन्य एका कारवाईत पोलिसांनी २१ लाख ५० हजार रुपये किमतीची अफू जप्त केली असून तीन जणांना अटक केली आहे. मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी सोमटा गावातल्या एका घरावर छापा टाकला. या छाप्यातून १४३ किलो ५१ ग्रॅम वजनाची अफुची बोंडं आणि त्याची पूड जप्त करण्यात आली. या प्रकरणी तीन जणांना अटक केली असून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

<><><><><>

क्रिकेटमध्ये १९ वर्षाखालच्या युवकांच्या विश्वचषक स्पर्धेत काल हरारे इथं झालेल्या उपांत्य सामन्यात अफगाणिस्तानवर ७ गडी राखून मात करत भारतानं अंतिम फेरी गाठली. अफगाणिस्ताननं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला, आणि शतकवीर फैजल शिनोजादाच्या ११०, आणि उजैरुल्ला नैजलच्या १०१ धावांच्या जोरावर, निर्धारित ५० षटकात ४ गडी गमावून ३१० धावा केल्या. भारतानं ३ गड्यांच्या मोबदल्यात, सामन्यातले ५३ चेंडू बाकी असताना ही धावसंख्या पार केली. आरोन जॉर्जनं ११५ धावा केल्या. तो सामन्यातला सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरला. वैभव सूर्यवंशीनं ३३ चेंडूत ६८, कर्णधार आयुष म्हात्रेनं ६२, तर विहान मल्होत्रानं नाबाद ३८ धावांचं योगदान दिलं.
विजेतेपदासाठी भारताची लढत उद्या इंग्लंडबरोबर होईल.

<><><><><>

महिला क्रिकेटमधे प्रीमीयर लीगच्या विजेतेपदासाठी आज गतविजेते दिल्ली कॅपिटल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात अंतिम लढत होणार आहे. बडोदा इथं साडेसातवाजता सामना सुरु होईल. यंदाच्या महिला प्रीमीयर लीग करता भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं सुमारे १० कोटी रुपयांची बक्षिसं घोषित केली आहेत.

<><><><><>

ओदिशामधल्या बिरसा मुंडा आंतरराष्ट्रीय हॉकी स्टेडियम मध्ये १० ते १५ फेब्रुवारी दरम्यान होणार असलेल्या एफ आय एच प्रो लीग स्पर्धेसाठी हॉकी इंडियानं २४ खेळाडूंच्या पुरुष संघाची निवड केली आहे. या स्पर्धेत अर्जेंटिना तसंच बेल्जियम सारखे बलाढ्य संघ सहभागी होणार असल्यानं भारतीय संघापुढं

मोठं आव्हान असणार आहे. या स्पर्धेतला भारताचा पहिला सामना १४ फेब्रुवारीला बेल्जियम विरुद्ध होईल.

**<><><><><>**

आकाशवाणीच्या माजी वृत्तनिवेदक आणि भाषांतरकार रविंदर सभरवाल यांचं आज नवीदिल्ली इथं प्रदीर्घ आजारानंतर निधन झालं. १९८५ ते २०१२ या काळात त्या आकाशवाणीच्या वृत्त सेवा विभागात कार्यरत होत्या.

**//<><><><><>//**